महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १४० वे | दिनांक : १५/०५/२०२६ | वार : शुक्रवार

## आरक्षणाची सवलत घेणाऱ्यांना आता खुल्या प्रवर्गाचे दरवाजे बंद : महाराष्ट्र शासनाचे नवीन धोरण



**मुंबई :** महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत सरकारी नोकरीतील आरक्षणासंदर्भात एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, ज्या उमेदवारांनी आरक्षणाची सवलत घेतली आहे, त्यांना आता खुल्या प्रवर्गातील जागांवर दावा सांगता येणार नाही. केंद्र सरकार आणि गुजरात राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्र सरकारनेही हे आरक्षणाचे नवे धोरण निश्चित केले असून, या निर्णयामुळे राज्य सरकारी नोकरभरतीच्या प्रक्रियेत मोठे बदल होणार आहेत.

राज्य सरकारने आरक्षणाचे धोरण स्पष्ट करण्यासाठी केंद्र आणि गुजरात राज्याच्या धर्तीवर एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, यानुसार वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव किंवा परीक्षेस बसण्याच्या संधींमध्ये सवलत घेतलेल्या राखीव प्रवर्गातील उमेदवारांची नियुक्ती आता केवळ त्यांच्या राखीव प्रवर्गातच केली जाईल. अशा उमेदवारांना आता खुल्या प्रवर्गातील जागेवर दावा सांगता येणार नाही, मात्र ज्यांनी केवळ राखीव प्रवर्गातून अर्ज आणि शुल्क भरले असून आरक्षणाचा इतर कोणताही लाभ घेतलेला नाही, त्यांना खुल्या प्रवर्गातून नियुक्ती मिळण्याचा मार्ग मोकळा असेल. आरक्षणाबाबतच्या स्पष्ट धोरणाअभावी सर्वोच्च न्यायालयात वारंवार निर्माण होणारी कायदेशीर गुंतागुंत टाळण्यासाठी सरकारने हे पाऊल उचलले आहे.

महाराष्ट्रातील सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षणाचे धोरण उभे आणि आडवे अशा दोन स्तरांवर राबवले जाते, ज्यामध्ये 2024 साली मराठा समाजाला 'एसईबीसी' प्रवर्गांतर्गत 10% आरक्षण लागू केल्यामुळे राज्यातील एकूण उभ्या आरक्षणाच्या प्रमाणात वाढ झाली आहे. या आरक्षणाची अंमलबजावणी जिल्हानिहाय किंवा न्यायालयीन निर्णयानुसार बदलू शकते, त्यामुळे अचूक माहितीसाठी संबंधित भरतीची जाहिरात आणि शासन निर्णयाचा संदर्भ घेणे आवश्यक आहे.

अनुसूचित जाती (SC) - 13% अनुसूचित जमाती (ST) - 7% विमुक्त जाती (VJ-A) - 3% भटक्या जमाती NT-B - 2.5% भटक्या जमाती NT-C (धनगर) - 3.5% भटक्या जमाती NT-D (वंजारी) - 2% विशेष मागास प्रवर्ग (SBC)- 2% इतर मागासवर्गीय (OBC) - 19% SEBC (मराठा समाज) - 10% आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) -10%

महिला दिव्यांग माजी सैनिक क्रीडापटू अनाथ प्रकल्पग्रस्त हे आरक्षण प्रत्येक मुख्य प्रवर्गाच्या (SC, ST, OBC, Open इ.) आत लागू केले जाते.

पारंपरिक सामाजिक आरक्षण (SC/ST/OBC/VJNT/SBC) मिळून सुमारे 52% SEBC (मराठा) जोडल्यास उभे आरक्षण सुमारे 62% EWS स्वतंत्र 10%

## अशोक खरात प्रकरणात उपजिल्हाधिकारी अभिजीत भांडे निलंबित



**नाशिक :** अशोक खरात प्रकरणात राजकीय नेत्यांच्या सहभागानंतर आता प्रशासकीय अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले असून, उपजिल्हाधिकारी अभिजीत भांडे यांना या प्रकरणात मोठा धक्का बसला आहे. खरातसोबत आर्थिक व्यवहार केल्याचा गंभीर आरोप भांडे यांच्यावर ठेवण्यात आला असून, याच कारणास्तव त्यांचे तात्काळ निलंबन करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.
महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अभिजित भांडे यांच्या निलंबनाचे आदेश दिल्याचे समजते. तपासादरम्यान अशोक खरात आणि भांडे यांच्यातील संभाषणाचे कॉल रेकॉर्ड्स समोर आले असून, त्यातून त्यांचे आर्थिक लागेबांधे स्पष्ट झाल्याने ही कडक कारवाई करण्यात आली आहे. उपजिल्हाधिकारी पदावर कार्यरत असलेल्या भांडे यांना हे आर्थिक व्यवहार चांगलेच भोवले असून, या कारवाईमुळे प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

अशोक खरात आणि उपजिल्हाधिकारी अभिजीत भांडे यांच्यातील धक्कादायक कॉल रेकॉर्ड्स समोर आले असून, 4 एप्रिल 2025 ते 15 मार्च 2026 या कालावधीत त्यांच्यात तब्बल 143 वेळा संवाद झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या संभाषणात खरातने भांडे यांना 83 वेळा, तर भांडे यांनी खरातला 60 वेळा कॉल केले होते. एकूण 10,037 सेकंद म्हणजेच जवळपास 3 तास चाललेल्या या चर्चेत 7 जुलै 2025 रोजी 10 कॉल, तर 23 नोव्हेंबर 2025 रोजी एकाच दिवसात 14 कॉल झाल्याची नोंद आहे. विशेष म्हणजे 7 ऑगस्ट 2025 रोजी त्यांच्यात सलग 11 मिनिटे प्रदीर्घ चर्चा झाली होती, ज्यामुळे त्यांच्यातील संबंधांच्या गांभीर्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या सबळ पुराव्यांच्या आधारे महसूलमंत्र्यांनी उपजिल्हाधिकारी अभिजीत भांडे यांच्या निलंबनाचे आदेश दिले असून प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. अशोक खरातसोबतच्या या सातत्यपूर्ण संपर्कामुळे भांडे यांच्यावर आर्थिक गैरव्यवहाराचे गंभीर आरोप होत आहेत. रुपाली चाकणकर यांच्यानंतर आता या प्रकरणात भांडे यांचीही सखोल चौकशी होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. खरात प्रकरणातील या नव्या खुलाशामुळे आता आणखी कोणते मोठे धागेदोरे समोर येणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

अशोक खरातशी असलेल्या कथित आर्थिक हितसंबंधांमुळे उपजिल्हाधिकारी अभिजीत भांडे यांच्या अडचणीत मोठी वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. खरातच्या पत्नी आणि मुलीच्या नावावर असलेल्या जमिनींमध्ये भांडे यांनी गुंतवणूक केल्याचा प्राथमिक आरोप असून, खरातशी संबंधित अनेक संशयास्पद व्यवहारांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असल्याचे बोलले जात आहे. भांडे यांच्यावर झालेल्या या कडक कारवाईमुळे महसूल विभागातील इतर अधिकारी, ज्यांचे खरातशी जवळचे संबंध होते, त्यांच्यामध्ये आता भीतीचे वातावरण पसरले आहे.

शेकडो महिलांच्या लैंगिक शोषणाचे गंभीर आरोप असलेल्या अशोक खरात प्रकरणामुळे रुपाली चाकणकर यांच्यासह अनेक राजकीय नेते आणि प्रशासकीय अधिकारी वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, मुख्यमंत्र्यांनी यातील सर्व संबंधितांची सखोल चौकशी करण्याचे स्पष्ट निर्देश दिले असून, कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही, असा सज्जड इशारा दिला आहे. मुख्यमंत्र्यांच्या या आक्रमक पवित्र्यानंतर आता खरातच्या निकटवर्तीयांचे धाबे दणाणले असून, तपासाचा हा फेरा नक्की कोणापर्यंत पोहोचणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## ३००० रुपये मिळण्याच्या आशेवर पाणी, खात्यात १५०० रुपयेच जमा




**मुंबई :** राज्य सरकारची अत्यंत लोकप्रिय आणि विधानसभा निवडणुकीत गेम चेंजर ठरलेली 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. गेल्या दोन महिन्यांपासून या योजनेच्या हप्त्याची वाट पाहणाऱ्या लाखो महिलांसाठी दिलासादायक बातमी समोर आली असून, लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात पैसे जमा होण्यास सुरुवात झाली आहे. मात्र, मार्च आणि एप्रिल अशा दोन महिन्यांचे एकत्रित ३००० रुपये मिळतील, या अपेक्षेत असलेल्या महिलांच्या पदरी तुर्तास १५०० रुपयेच पडल्याचे दिसून येत आहे.
फेब्रुवारी महिन्यानंतर मार्च आणि एप्रिल या दोन महिन्यांचा हप्ता तांत्रिक कारणांमुळे रखडला होता. मे महिना उजाडल्यानंतरही खात्यात पैसे जमा न झाल्याने ग्रामीण व शहरी भागातील लाभार्थी महिलांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत होता. सरकार दोन्ही महिन्यांची थकबाकी एकाच वेळी देईल, असा मोठा दावा काही दिवसांपासून केला जात होता. मात्र, आज अनेक महिलांच्या मोबाईलवर १५०० रुपये जमा झाल्याचे संदेश धडकल्याने महिलांमध्ये आनंदासह काहीसा भ्रमनिरासही पाहायला मिळत आहे.
मार्च आणि एप्रिल अशा दोन्ही महिन्यांचे मिळून ३००० रुपये थेट खात्यात येतील, अशी लाभार्थी महिलांना खात्री होती. प्रत्यक्षात मात्र सरकारने एकाच महिन्याचा हप्ता वर्ग केला आहे. उर्वरित १५०० रुपये येत्या काही दिवसांत जमा होणार की त्यासाठी आणखी प्रतिक्षा करावी लागणार, याबाबत अद्याप स्पष्टता मिळालेली नाही. प्रशासनाने महिलांना आपले बँक खाते तपासून घेण्याचे आवाहन केले आहे.

या योजनेत पारदर्शकता आणण्यासाठी सरकारने कडक पावले उचलली आहेत. नियमांचे उल्लंघन करून किंवा चुकीची माहिती देऊन योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांची नावे शोधून ती यादीतून वगळण्यात आली आहेत. यामुळे लाभार्थी महिलांच्या संख्येत घट झाली असून, केवळ पात्र आणि गरजू महिलांनाच या योजनेचा लाभ मिळावा, याची खबरदारी घेतली जात आहे.

योजनेचा लाभ निरंतर सुरू राहण्यासाठी सरकारने सर्व लाभार्थी महिलांना 'केवायसी' (KYC) पूर्ण करण्याची सूचना केली होती. सुरुवातीला यासाठी ३१ मार्च २०२६ पर्यंतची मुदत देण्यात आली होती, मात्र अनेक महिलांची प्रक्रिया अपूर्ण असल्याने ही मुदत ३० एप्रिल २०२६ पर्यंत वाढवण्यात आली होती. ज्या महिलांनी ही प्रक्रिया वेळेत पूर्ण केली आहे, त्यांच्याच खात्यात आता पैसे जमा होत असल्याची माहिती समोर आली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १५ मे २०२६


# सुखना बचाओ जनआंदोलन संघर्ष समिती आगामी काळात विविध उपक्रम राबविणार




सुखना नदी संवर्धन व पुनरुज्जीवन करण्यासाठी गेली पाच वर्षे सुखना बचाओ जनआंदोलन संघर्ष समिती कार्यरत आहे. सुखना नदी बचाओ चा पहिला टप्पा म्हणून यापूर्वी समितीतर्फे शिवार फेरी, सुखना जनसंवाद यात्रा, तज्ञाची मार्गदर्शक व्याख्याने, नदी उगम व संगमावर विविध कार्यक्रमाचे आयोजन, सुखना प्रकल्पावर पक्षिनिरीक्षण, सुखना भूषण पुरस्कार, सुखनाकाठी पुस्तक प्रकाशने व कविसंमेलने , पत्रके वाटून जनजागृती. गावागावात व्यापक जागृती, असे कितीतरी उपक्रम घेण्यात आले. उद्देश एकच की सुखना नदी ची चर्चा सर्वत्र व्हावी, जनजागृती वाढावी, लोक नदिशी जोडले जावेत. पर्यावरण व नदीविषयक जाणिव जागृती व्हावी. नदी संवर्धनाची चळवळ गतिमान व्हावी. दुसऱ्या पातळीवर शासन, प्रशासन, राजकीय नेते, कार्यकर्ते यांना निवेदने देवून सुखना नदी संवर्धन व पुनरुज्जीवन करण्यासंबंधीची मागणी सातत्याने करण्यात आली. अनेक बैठक प्रशासनासोबत संपन्न झाल्या. दै. महाराष्ट्र टाईम्स, दै. सकाळ, दै. लोकमत, दै. दखनी स्वराज्य, दै. प्रसार, दै. देशोन्नती ,दै. दिव्य मराठी अशा सर्वच दैनिकांनी व इतर डिजिटल माध्यमांनी या जनआंदोलनाची दखल घेऊन या जन आंदोलनाला गती दिली. व्यापक चर्चा घडवून आणली. नदीच्या समस्येवर प्रकाश टाकला. अनेक शिक्षक,कार्यकर्ते, साहित्यिक, अधिकारी, संघटना, मान्यवर नेते यांचे सतत मार्गदर्शन व सहकार्य समितीस लाभले. त्यामुळेच या चळवळीला अधिक बळ मिळाले. सुखना नदीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. ती मृतप्राय झाली आहे. पाणी प्रचंड प्रदुषित झाली आहे. वाळू उपसा मोठ्या प्रमाणात होत आहे. हे प्रामुख्याने सुखनाचे प्रश्न आहेत. वास्तविक नदी संवर्धन व पुनरुज्जीवन म्हणजे केवळ नदी उकरणे नाही. सुशोभिकरण करणे ही नाही. नदी इतकी प्रदुषित झाली असतांना समाजाचेही प्रचंड दुर्लक्ष होणे ही गोष्ट ही अत्यंत घातक आहे. नदी संस्कृती संवर्धनाचे ही काम करते. त्यामुळे नदीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. या पाच वर्षात सुखना संवर्धनाचा विषय ऐरणीवर आला. नदी संवर्धन म्हणजे जेशिबी लाऊन नदी उकरणे नाही तर सर्व सुखना नदी खोऱ्यांचा सर्वांगिण विकास होणे अपेक्षित आहे. तसेच तिच्या उपनद्या यांचेही पुनरुज्जीवन होणे अपेक्षित आहे. हे जनआंदोलन लोकशाही मार्गाने सुरू आहे. मुळात हे जनआंदोलन निरपेक्ष भावनेने सुरू आहे. त्यापाठीमागे कोणताही हेतू नाही. असेल तर चांगलाच हेतू आहे. त्यामुळेच या जनआंदोलनात विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सहभाग आहे. टप्पा टप्प्याने हा विषय आम्ही पुढे घेऊन जाणार आहोत. आता या जनआंदोलनाचा दुसरा टप्पा सुरू होत आहे. सुखनो बचाओकडून सुखना बनाओ हा तो टप्पा आहे. या टप्यात आता पुढची रणनिती ठरविण्यात आली आहे. समितीची बैठक २ मे २०२६ रोजी चिकलठाणा येथे झाली. त्यात विविध विषयावर चर्चा झाली. जवळपास २० ते २५ ठराव घेण्यात आले. या ठरावानुसार आगामी काळात ही समिती पाठपुरावा करणार आहे. त्यापैकी काही ठराव असे सुखना नदी पुनरुजीवन व संवर्धन विकास आराखडा तयार करा. मिशन गाळमुक्त सुखना, नाले शुद्धिकरण मोहिम राबवा. नदीत निर्माल्य व घनकचरा विसर्जनावर बंदी आणावी. सुखना चे हेल्थ कार्ड जाहीर करा. सुखनाचा स्वतंत्र DPR तयार करा. सुखना नदी व्यवस्थापन प्राधिकरण स्थापन करा. नदीपात्रापासून ३० मिटर क्षेत्र नो डेव्हलपमेंट नो केमिकल फार्मिंग झोन अधिसूचित करावे, गावोगावी सुखना रक्षक दल स्थापन करावे. माझे भविष्य माझी नदी हा उपक्रम विद्यार्थात राबवा. अवैध्य वाळू उपसा थांबवा. कोल्हापुरी बंधाऱ्याची दुरुस्ती व नदीकाठी जमिनी वाहून गेलेल्या शेतकऱ्यांना भरीव मदत घ्यावी. सुखना नदीवरील पुलाचे नव्याने बांधकाम करावे. सुखना नदीकाठच्या ऐतिहासिक वारसा स्थळाचे जतन व संवर्धन करावे. सुखना नदीवर ठिकठिकाणी बंधारे बांधावे, २०३ १ पर्यंत निर्मल सुखना जाहीर करावे असे जवळपास २५ ठराव मंजूर करून घेऊन त्यावर काम करण्याचे ठरले. शासन व प्रशासनाकडे पाठपुरावा करून पुढील कामे मार्गी लावणे, हे काम आगामी काळात होणार आहे. त्यासंदर्भात मा. विभागीय आयुक्त, मा.जिल्हाधिकारी, मा. महापौर मनपा, मा. मुख्यमंत्री, मा. पर्यावण मंत्री, मा. बांधकाम व जलसंपदा मंत्री यांना निवेदने देऊन हे ठराव मार्गी लागावे यासाठी विशेष प्रयत्न होणार आहे. आगामी काळात शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, शाळा, महाविद्यालये, विविध संस्था, संघटना यांच्या भेटी घेऊन हा विषय मांडून त्यांना सहभागी करून घेणार आहोत. तसेच समिती तर्फे काही उपक्रम हाती घेतले जाणार आहे. समाजाला नदीशी जोडणे हा प्रमुख उद्देश त्या पाठिमागे आहे. त्यात शाळा भेट, सुखना कट्टा, सुखना वॉक, श्रमदान , स्वच्छता, वृक्षरोपन, कासाळगंगा नदी संवर्धन प्रकल्पास भेट अभ्यास दौरा, चिते नदी परिसरास भेट, सुखना नदी परिक्रमा, सुखना नदी महोत्सव, सुखना पक्षी महोत्सव, सुखना नदी पाणलोटाचे सर्वेक्षण करणे, असे अनेक उपक्रम आगामी काळात टप्या टप्याने लोकसहभागातून राबविण्यात येणार आहे. तसेच शेतकरी मेळावे, कृषी पर्यटन, ऐतिहासिक वारसा स्थळांची माहिती जमा करणे त्याचे दस्त ऐवजीकरण करणे असे उपक्रम या दुसऱ्या टप्यात घेण्यात येणार आहे. तसेच सुखना पाणी परिषद ,नर्मदा बचाओ जन आंदोलनाच्या प्रणेत्या मेधाताई पाटकर, व भारत पाटणकर आणि जलतज्ञाच्या मार्गदर्शनाखाली घेण्याचा मानस आहे. थोडक्यात काय तर सुखना बचाओकडून हे जनआंदोलन आता सुखना बनाओकडे वाटचाल करणार आहे. विधायक व रचनात्मक पद्धतीने हे जन आंदोलन टप्याटप्याने पुढे घेऊन जाणार आहोत. आपणही या उपकुमात सहभागी व्हावे,अशी जाहीर आवाहन आपणास करीत आहे.

**प्रा. डॉ. शिवाजी हुसे**
**संस्थापक - अध्यक्षसुखना बचाओ जनआंदोलन संघर्ष समिती**

# आई बापा शिवाय

आईबापांच्या सावलीशिवाय
माणसाला किंमत नाही,
घर मोठं असलं तरी
मनाला उब मिळत नाही।

ज्यांनी जन्मदात्यांच्या डोळ्यात
अश्रूंची रात्र पेटवली,
संपत्तीच्या मोहापायी
नात्यांची माती केली।

भाऊ बहिणींच्या प्रेमाला
जमिनीच्या तुकड्यांत तोडलं,
लोभाच्या आगीत नात्यांचं
सोन्यासारखं घर जाळलं।

बघा त्यांचा भोवताल,
ना नात्यात मान उरला,
ना समाजाने केला सन्मान,
स्वार्थापोटी जीनच झालं खराब।

आईबाप हेच खरे दैवत,
त्यांच्या चरणी सुख दडलेलं,
ज्यांनी त्यांना जपलं प्रेमानं
त्यांच्याच संसाराचं फूल फुललेलं।

पैसा, जमीन, मोठेपणा
क्षणात सारे संपून जातं,
आईबापांचा आशीर्वाद
जीवनभर साथ देतं।

मेल्यानंतर राखही ठेवत नाही
सोडली जाते पाण्यात,
कशाचा गर्व, कशाची मस्ती
धनासाठी नातंही करून टाकता
परकं!

म्हणून जपा ती माया,
नका नात्यांना तोडू,
आईवडिलांच्या प्रेमासाठी
अहंकार बाजूला ठेवून एकमेकांना
जोडू।



**डॉ बाळासाहेब लिहिणार**


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १५ मे २०२६


## तोफखाना केंद्रीय विद्यालयाने १००% उत्तीर्णतेची टक्केवारी गाठली; सीबीएसई १२ वीच्या विद्यार्थ्यांची उत्कृष्ट कामगिरी



निर्मल खत्री
वाणिज्य - ९१.२०%



सोनू यादव
विज्ञान- ८९.८०.



जान्हवी सिंह.
कला- ८७.८०%

**नाशिक (प्रतिनिधी):** शहरातील तोफखाना केंद्र परिसरातील पीएम श्री केंद्रीय विद्यालय नाशिक रोड कॅम्पने सीबीएसई इयत्ता १२वीच्या परीक्षेत १००% निकाल मिळवून पुन्हा एकदा उत्कृष्ट कामगिरी केली आहे. कला, वाणिज्य आणि विज्ञान या तिन्ही शाखांमधील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण मिळवले आहेत, जे शाळेचे मजबूत शैक्षणिक वातावरण आणि उत्कृष्टतेप्रती असलेली वचनबद्धता दर्शवते.जान्हवी सिंगने कला शाखेत ८७.८०% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. सोनू यादवने विज्ञान शाखेत ८९.८०% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला.तर निर्मल चेतनकुमार खत्री ने वाणिज्य शाखेत ९१.२०% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आणि तो शाळेत सर्वांत गुणवंत ठरला. प्राचार्य गजराज मीना यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि या उत्कृष्ट कामगिरीबद्दल विद्यार्थी, पालक व शिक्षकांच्या एकत्रित प्रयत्नांची प्रशंसा केली. ते म्हणाले की, हा उत्कृष्ट निकाल शिस्त, कठोर परिश्रम आणि शिक्षकांच्या सतत मार्गदर्शनाचा परिणाम आहे. शाळेने विशेषतः उज्वला चांदोरकर, निमिषा सिंग, शैलेंद्र कुमार यादव, पूजा अग्रवाल, मनीषा विनीत, देवा राम, कृष्णा आव्हाड, सतीश बडगुजर, अमित कुमार शुक्ला आणि कल्पना शिंदे यांच्या समर्पित प्रयत्नांची प्रशंसा केली, ज्यांच्या मार्गदर्शनाने आणि वचनबद्धतेने विद्यार्थ्यांच्या यशात महत्त्वाची भूमिका बजावली. विद्यार्थी आणि शिक्षकांनी हा अभिमानाचा क्षण एकत्र साजरा केल्यामुळे शाळेचा परिसर आनंद आणि उत्साहाने भरून गेला.

## सेवानिवृत्त केंद्रप्रमुख कमलाकर मोटे यांना पीएच. डी. पदवी प्रदान



**मुरुम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** जिद्द आणि चिकाटी असेल तर वयाची कोणतीही अट ज्ञानाच्या आड येत नाही, याचाच प्रत्यय मुरुम येथील सेवानिवृत्त केंद्रप्रमुख कमलाकर मोटे यांनी दिला आहे. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथून इतिहास विषयात विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी संपादन केली असून, त्यांच्या या यशाबद्दल सर्वस्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. कमलाकर मोटे यांनी उमरगा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील प्रो. डॉ. भिम माने यांच्या मार्गदर्शनाखाली आपला शोधप्रबंध पूर्ण केला. त्यांच्या संशोधनाचा विषय " लातूर शहराचा सामाजिक, आर्थिक व राजकीय इतिहास : एक चिकित्सक अभ्यास " हा होता. अत्यंत सखोल आणि वस्तुनिष्ठ पद्धतीने त्यांनी लातूर शहराच्या ऐतिहासिक जडणघडणीचा मागोवा या प्रबंधातून घेतला आहे. नुकतीच त्यांची ऑनलाइन मौखिक परीक्षा यशस्वीरीत्या पार पडली. कमलाकर मोटे यांनी जिल्हा परिषद केंद्रीय शाळेत केंद्रप्रमुख म्हणून दीर्घकाळ सेवा बजावली आहे. त्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाने त्यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित केले आहे. याशिवाय अनेक सामाजिक संस्थांनीही त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. निवृत्तीनंतर विश्रांती न घेता त्यांनी संशोधनाचे क्षेत्र निवडले आणि त्यात यश संपादन करून समाजासमोर एक नवा आदर्श ठेवला आहे. केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे, तर सामाजिक क्षेत्रातही मोटे यांचा मोठा वाटा आहे. त्यांनी आंतरराष्ट्रीय रोटरी क्लब, मुरुम सिटीचे अध्यक्षपद भूषवले असून, सामाजिक चळवळीत ते सदैव सक्रिय असतात. विशेष म्हणजे, त्यांनी मरणोत्तर देहदानाचा संकल्प करून आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे. त्यांच्या या यशाबद्दल उमरगा-लोहारा तालुक्याचे आमदार प्रवीण स्वामी, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे, प्रो. डॉ. ओमप्रकाश लिगाडे, प्रो. डॉ. शिवपुत्र कनाडे, अर्जुन धुळेकर (लातूर), प्रो. डॉ. भूषण फडतरे (पुणे), सुरेश (बापू) साळुंके, पत्रकार गुणवंत जाधवर, प्रो. डॉ. त्र्यंबक पाटील, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य प्रो. डॉ. व्यंकटेश लांब, बीड येथील प्रा. डॉ. ओमप्रकाश चिलगर, लक्ष्मीकांत पटणे, सोलापूरचे डॉ. प्रभाकर कोळेकर आदींनी त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे. निवृत्तीनंतरच्या या शैक्षणिक यशाचे मुरुम शहरासह संपूर्ण जिल्ह्यातून कौतुक केले जात आहे.

## बालरंगभूमी परिषद तर्फे बालनाट्य प्रशिक्षण व विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास शिबिराचे आयोजन



**छत्रपती संभाजीनगर :** बालरंगभूमी परिषद छत्रपती संभाजीनगर जिल्हा शाखा तर्फे बालनाट्य प्रशिक्षण विद्यार्थी व व्यक्तिमत्व विकास शिबिराचे आयोजन सावित्रीबाई फुले एकात्म समाज मंडळ, मिलिंद नगर या ठिकाणी दिनांक १३ ते १६ मे २०२६ या कालावधीत करण्यात आले आहे.शिबिराचे उद्घाटन रमाकांत वट्टमवार, प्यारेलाल जी भान सर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी बालरंग भूमी परिषदेत छत्रपती संभाजी नगर शाखेचे उपाध्यक्ष वाल्मीक जाधव प्रमुख कार्यवाह गोकुळ गायकवाड अर्चना देवधर मॅडम आदी उपस्थित होते या शिबिरात उद्घाटनाच्या दिवशी शिबिरासाठी प्रशिक्षक म्हणून ज्येष्ठ रंगकर्मी शरद कुलकर्णी यांनी पहिल्या सत्रात शिबिर शिबिरार्थींना बालनाट्य ओळख आणि अभिनय या विषयावर मार्गदर्शन केले. वाल्मीक जाधव यांनी प्रकाश योजनेचे महत्त्व याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, रंगकर्मी अर्चना देवधर यांनी योगा आणि अभिनय विषयावर मार्गदर्शन केले तर रंगकर्मी गोकुळ गायकवाड यांनी थिएटर गेम्स आणि अभिनय विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच रेणुका भालेराव यांनी अबॅकस चे एक सत्र घेतले. तसेच मंडळाचे अध्यक्ष सविता कुलकर्णी मॅडम यांचे सहकार्य लाभले. दुसऱ्या दिवशी अभिजीत भाटलोंडे यांनी नृत्य आणि विविध थिएटर गेम्स घेतले. त्यानंतर लक्ष्मण अहिरे यांनी विविध लोककलेची माहिती दिली. सदर शिबिर हे नि:शुल्क असून ४ दिवसीय या शिबिरात ५० विद्यार्थिनी सहभाग घेतला असून दररोज सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळेत चार सत्र मध्ये या शिबिरात विद्यार्थ्यांना विविध विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी शहरातील मान्यवरांना आमंत्रित करण्यात आले आहे.


### जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १५ मे २०२६

## श्री महात्मा बसवेश्वर पतसंस्थेचा १७ वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील श्री महात्मा बसवेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेचा १७ वा वर्धापन दिन मंगळवारी (ता. १२) बसव सहकार भवन येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी खासदार रवींद्र गायकवाड यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलन करून करण्यात आले. वर्धापन दिनाचे औचित्य साधून उमरगा तालुक्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगर परिषद निवडणुकीत नवनिर्वाचित ठरलेल्या मान्यवरांचा विशेष सत्कार करण्यात आला. लोकसेवेच्या कार्यात या लोकप्रतिनिधींनी मोलाचे योगदान द्यावे, अशी भावना रवींद्र गायकवाड यांनी यावेळी व्यक्त केली. केवळ राजकीयच नव्हे, तर शैक्षणिक क्षेत्रात दैदिप्यमान यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचाही संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला. यामध्ये सुषमा देसाई, मनोज गायकवाड, तुकाराम बोडले, अनिल गुरव, समीक्षा शिंदे, रोहिणी रामपुरे, अनिरुद्ध दूरकर आणि सुषमा चव्हाण या गुणवंतांचा समावेश होता. रक्तदान शिबिरमाजी खासदार रवींद्र गायकवाड यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून यावेळी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक उत्तरदायित्व जपत अनेक तरुणांनी व नागरिकांनी या शिबिरात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून रक्तदान केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना पतसंस्थेचे अध्यक्ष शिवशरण वरनाळे म्हणाले की, गेल्या १७ वर्षांपासून सभासदांनी जो विश्वास संस्थेवर दाखवला आहे, त्याच बळावर आज संस्था प्रगतीपथावर आहे. आगामी काळात सर्वांच्या सहकार्याने ही संस्था अधिक सक्षमपणे ग्राहकांच्या सेवेत कार्यरत राहील. माजी प्राचार्य दत्तात्रय इंगळे यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. या सोहळ्याला जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्ष सौ. उषाताई रवींद्र गायकवाड, उमरगा पंचायत समितीच्या सभापती ॲड. आकांक्षा चौगुले, नगराध्यक्ष किरण रवींद्र गायकवाड, जिल्हा परिषद सदस्य आप्पासाहेब पाटील, माजी नगरसेवक चंद्रशेखर मुदकण्णा, भीमराव वरनाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच संस्थेचे उपाध्यक्ष शरणाप्पा मुदकण्णा, सचिव कमलाकर जाधव, संचालक वंदना सोनवणे, संगीता जाधव, शिवराज समन, आनंत हिरमुखे, बाबासाहेब पाटील, इंद्रजित लोखंडे, अमृत वरनाळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनोज बोंदर यांनी केले, सूत्रसंचालन किरण गायकवाड यांनी तर आभार मनीष मुदकण्णा यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाखाधिकारी दत्तात्रय कांबळे, चिदानंद स्वामी, प्रशांत काशेट्टी, सचिन कंटेकुरे, धीरज मुदकण्णा, नेहा शेवाळकर, खंडेराव गुरव, संतोष मुदकण्णा व महंतय्या स्वामी आदींनी परिश्रम घेतले. या दर्जेदार आयोजनाबद्दल पतसंस्थेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## मंत्रिमंडळ निर्णय (संक्षिप्त)

**बीड (भगवंत पाळवदे) :** पाटबंधारे प्रकल्पांच्या जलाशयातील गाळ व गाळमिश्रित वाळू काढण्याचे सुधारित धोरण. सहा मोठ्या प्रकल्पातून प्रायोगिक तत्त्वावर गाळ व गाळमिश्रित वाळू काढण्यात येणार. पाणीसाठा वाढणार, शेतकऱ्यांना सूपीक गाळ मिळणार. धरणांचेही जतन — संवर्धन. (जलसंपदा विभाग)• नाशिक जिल्ह्यातील अंबोली-वेळुंजे प्रवाही वळण योजना प्रकल्पासाठी ४९ कोटी २६ लाख रुपयांच्या तरतुदीस मान्यता. (जलसंपदा विभाग)• सिंधुदुर्ग, रत्नागिरी जिल्ह्यांसाठी "सिंधुरत्न समृद्ध योजना २.०" आणखी तीन वर्षांसाठी राबविण्यात येणार. नैसर्गिक साधनसंपत्तीच्या परिणामकारक नियोजनातून जिल्ह्यांचा सर्वंकष विकास साधण्यावर भर.(नियोजन विभाग) • वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, परिक्षेस बसण्याची संधीची सवलत घेतलेल्या राखीव प्रवर्गातील उमेदवारांची नियुक्ती आता राखीव प्रवर्गातच होणार. अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील जागेवर दावा सांगता येणार नाही. (सामान्य प्रशासन विभाग)• विजाभज प्रवर्गाच्या खाजगी अनुदानित निवासी उच्च माध्यमिक आश्रमशाळांतील उच्च माध्यमिक शिक्षकांना, १२ व २४ वर्षाच्या नियमित सेवेनंतर, चट्टोपाध्याय आयोगानुसार वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी लागू करण्यास मान्यता. (इतर मागास बहुजन कल्याण) • कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक संस्थेला दरवर्षी दहा लाख रुपयांचे अनुदान. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या "साहित्य संस्थांना अनुदाने" योजनेतून सन २०२६-२७ पासून निधी मिळणार. (मराठी भाषा विभाग)• नाशिक परिक्रमा मार्ग (रिंग रोड) प्रकल्पासाठी आवश्यक अशा जमीन खरेदीवरील मुद्रांक शुल्कात सवलत देण्यास मान्यता. (सार्वजनिक बांधकाम) • मृद व जलसंधारण विभागाचा सुधारित आकृतीबंध निश्चित. राज्यातील सुमारे ८ हजार ७६७ पदांना मान्यता. विभागाकरिता ६ हजार ४८१ व महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकरिता दोन पदांसह ६ हजार ४८३ पदांव्यतिरिक्त सुमारे २ हजार २८४ वाढीव पदे. विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेची फेररचना होणार. (मृद व जलसंधारण)• पुणे महानगरपालिकेच्या पुणे नदी पुनरुज्जीवन प्रकल्पातील मुळा-मुठा नदीचा विकासासाठी तीन शासकीय जमिनी विनामुल्य हस्तांतरित होणार. मुळा — मुठा संगमवाडी पूल ते बंडगार्डन पूल दरम्यानची नदी पात्रातील, तसेच बॉटेनिकल गार्डन व महिला बाल व सुधार गृहाची जमीन पुणे महापालिकेस प्रकल्प पूर्ण करण्यासाठी देण्यात येणार. (महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क)• संत्रा आयात शुल्क परतावा योजना रद्द करण्याचा निर्णय. बांग्लादेशला निर्यात होणाऱ्या संत्र्याकरीता आयात शुल्कात ५० टक्के अनुदान देण्यात येत होते. या योजनेचा राज्यातील शेतकऱ्यांना लाभ होत नसल्याने आणि ही योजना बंद करण्यासाठी अनेक निवेदने आल्याने निर्णय. (पणन विभाग)• वैद्यकीय संस्थांच्या इमारतींसाठी विकास शुल्कामध्ये आता पन्नास टक्के सवलत. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसारमध्ये सुधारणा करणार. यापुर्वी मिळणाऱ्या २५ टक्क्यांच्या सवलतीत आता ५० टक्क्यांपर्यंत वाढ. (नगर विकास विभाग)• महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग अधिनियम, २०२५ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता. राज्य अनुसूचित जमाती आयोगासाठी उपाध्यक्ष पदाची नव्याने निर्मिती. (आदिवासी विकास विभाग) • महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग अधिनियम, २०२५ (सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७)" मध्ये सुधारणा करण्यास मान्यता. राज्य अनुसूचित जाती आयोगासाठी उपाध्यक्ष पदाची नव्याने निर्मिती. (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग) संकलक : भगवंत पाळवदे, बीड

१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १५ मे २०२६

# शापित कोलाहलाच्या नोंदी : बाईचं दु:ख उजागर करणारी कविता




कवीवर्य शब्द स्नेही सन्मित्र अरविंदा भामरे यांचा विविध पुरस्कार प्राप्त कवितासंग्रह जाणिवपूर्वक पाठवला.मी कायम ऋणाईतच.सृजनसंवाद प्रकाशनाचे अतिशय आशय संपन्न सृजन समर्पक बांधणी.गीतेश जी मनस्वी.मन व्याकूळ होते ते असे 'कपाळ पुसल्यावर उन्हातल्या जखमा पदर फाडून फाडून बांधणाऱ्या माझ्या आईस'..ही अर्पण पत्रिका डोळ्यात आसवे देऊन जाते.युगानु युगाच्या अगतिक माई भूईच खडतर जगणं ही कविता संयत मनोभूमिकेतून अस्सल ठणक घेऊन येते.एक सृजनशील मातृत्वाचा ओला मायाळू पाझर सृजनशील कोणत्याही कवीत असतो.पण पुरूषी अहंकार जिथं गळून पडतो तिथंचं हे माय बाप लेक व पत्नी हे नाळेच नात घट्ट होतं तिथं ही खोलवर झिरपत जाणारी बाई मातृत्वाची इश्वरी ओंजळभर ओल म्हणजे ही कविता आहे.बाईच्या पुर्वसचिंताच्या वेदनचा कोलाहल आहे.या संचिताची ती संचयिका होते.कवीने स्त्रीत्वाच्या वेदनेला निस्सीम भक्तीनेव्यक्त करुन संविधानीय अंजनाचं कोंदण या कवितेमधून मुखर केले आहे.'बाईमाणूस'ती या उत्पत्तीची जननी आहे.*तू पुर्णपणे बाई नाहीस/अन् माणूस ही नाहीस/म्हणून तुला म्हणतो आम्ही बाईमाणूस*(पृ.२६)या पुरुषी मनोवृत्ती समाजव्यवस्था तिची हतबलता, इथल्या षडयंत्र युगाचा उदय आणि अस्त नाहीच.लिंगभेदाच्या गचपनात पुन्हा तो लिंग प्रत्यारोपन शस्त्रक्रिया करून ही मायथा◌ॅला◌ॅजीचं जणू लिंगपिसाट झाली आहे म्हणून.तृतियपंथी या व्यवस्थेची शिकार होते आहे.तिचा तुच्छतेने स्विकार ही विकृत मानसिकता इतक्या हळुवारपणे कवीने आई माई बाई म्हणून व्यक्त केली आहे.जन्माची आख्यायिका,तू एवढं कर, निरोप, आम्ही कोण? 'भाकरीचा गोल' छक्के, हिजडा,टाळ्या वाजवून पैसे मागणारी ही भाकरीची भूक फक्त हीच करू शकते.हा भाकरीचा गोल अजगर होऊन सरपटत राहतो इथल्या व्यवस्थेच्या रस्त्यावर."तुला किन्नर, हिजडा,छक्का बाई-माणूस असं म्हणणारे, आम्ही कोण?/तुझ्या अंतरंगात दडलंय माणसाचं मन/तू माणसारखाचं जगतोय,/मरतोय माणूस होऊन/मग तुला/नाकारणारे आम्ही कोण?*/(पृ.३३) खरोखरच यथोचित सन्मान हा झाला पाहिजे.बाई म्हणून ही कविता मानवी मानाच्या तळाचा शोध घेते.मी जन्मलो आई मुळे,या सृष्टीची ती माता आहे.गुणसुत्रीय संक्षिप्त रूप म्हणजे मायी.तिच्या उदारात होता तेंव्हा ती हरखून गेली होती.पुढे बाई माई भूई केवळ काटेरी उनगा म्हणून जळतचं राहिली.या कवितेने स्त्री सत्याचा अग्नीहोम मांडला आहे.तो हाशापित स्त्री आत्म्यांचा ढणकणारा कोलाहल.कवी अरविंदा भामरे यांच्या अभ्यास चिंतनाचा हा कॅनव्हास आहे.गावखेडे ते आजचे बंबाळ रक्ताळले शहर व त्यातील मायभगीनी त्यांच्या देहधुनीची ही प्रत्येक कविता म्हणजे एक कथा विश्व आहे.भारतीय नारी तिला दैवताचे अधिष्ठान दिलेले आहे.जेंव्हा अर्जूनला ही बृहन्डेचं रुप धारण करावं लागले.किंवा खरा नर म्हणजे अश्व आहे.कारण त्याला स्तनाग्रे नाहीत तो खरा नर.या जननी मायेनं हे सारं विश्व कवेत घेतले आहे.ती षंढ धारणेतून जायचंनाही कारण तिलाच मातृत्वाच्या कळा येतात तीच खरी माता.अगदी याच निस्सीम सृजनशील भावनेचा ओलावा म्हणजे ही कविता आहे.'या वेश्या वस्तीतील रक्तबंबाळ नोदी'या भागात जेव्हा मनाचा आरसा पाहिला तर आजच्या वर्तमानाची अस्वस्थ करणारी नोंद आली आहे.माणसं वरवरून सादी-भादी वाटता पण ती तितकीच विकृत व सैतानी युगातील आहेत.पिढीजात 'शोषण' चालू आहे.हे सारं वासनांध रक्त तुच थांबवतेस 'बये तुझे आभार' 'तुझ्या वेश्यावस्तीवर येणारी माणसं/तू सामावून घेतेस/तुझ्या आदिम कुशीत,/कोणतीच जात धर्म न विचारता/अगदी माझ्या गावालगत/वाहणाऱ्या नदीसारखी (पृ.३९) हे डोळे उघडणार निरंजन तिथे जात पात धर्म पंथ नसतो.तिथे योनीचा बाजार भरलेला आहे.ती वेश्यावस्ती म्हणजे ही वासनेच्या कढाईत लचके तोडून तळमळत भाजून निघणारी स्त्री कवीने मोठ्या धिरोदत्तपणे व्यक्त केली आहे.'कोठ्यातली गाय' हे मातृत्व की चारित्र्य? या द्वैतात/ती कुणाकडे?/का हे प्रश्न मनातच येऊ देऊ नका... अन्यथा तुमच्या संस्कृतीला/क्रा◌ॅनिक डिसिज झाला म्हणून समजा/ (पृ.४०) वेश्या वस्तीतल्या बायांचं कुजत सोडतं जगणं 'तिच्या म्हतारवयात'ती त्या भयानरात्रीची साक्षीदार असते तिला झोप नसते केव्हाही ती हाजीर असते.तिचे लचके तोडणारे ती नाही करू शकत तक्रार.या पांढरपेशा व्यवस्थेत तो स्पर्श जीव घेना असतो पण इथं पोटाची भाकर होऊन आलेला स्पर्श.तो जातांना वेश्या म्हणून जातो.बाईच्या अंतर्मनला ही जणू भूल दिलेली आहे कारण ती खरी लढवावी आहे.हे शहरातल्या वेश्याचं आत्मकथन आलं तर साऱ्याच बायका विधवा होऊन मसालेदार आत्मकथन येईल.ही सखेद वेदना ही कविता मुखर करते.वेश्यला जात नसते योनी पाक असते.जात न विचारता मनाचा भोग होतो.वधू-वर मोळाव्यात जाती शिवाय मातीच खात नाही अशी भूमिका घेतली जाते.'कवितेचं पान' चारित्र्य मनु तूच सांग भोगाला कोणतं चारित्र्य.पोलिस अधिकारी धाडी टाकतो.पेपराचं बोटभर पान छापून येतं अधिकारी लपून आपलं दमण शमवून घेतो.वेश्येच्या पोराला बाप कोण?कुठला थांगपत्ता ती कायमचं अनुत्तीर्ण ही वास्तव कळ मनात सल धरून आहे.या कवितेच्या सूर्यानेचं पडेल भगदाड.ही कविता संयत विद्रोह पेरते.या शोषित पिडीत वंचित व अगतिक वेदनेच्या देहावर ही कविता फुंकर घालते आणि सामाजिक वास्तव या काळ्याकुट्ट अंधारकोठीत उजेड देते.बाई माई आई म्हणून तिचा 'आदर'झालाच पाहिजे.बाई आई म्हणून माणसा,तिचा आदर करायला शीक!कवी अरविंदा भामरे मनोगत व्यक्त करतात "या संग्रहातील एक एक कविता माझ्या संवेदनशील काळजाच्या भट्टीतून तापून बाहेर आली आहे.मला स्वतःला या गोष्टीचा आनंद आहे.मी ठरवून कवी झालो नाही.झाडावरची पाने सहज उमलावी, गायीला पान्हा सहज भरून यावा, आकाशात वीज चमकावी तशी माझी कविता आहे.कोणत्याही बाजार मूल्यातल्या सौदेबाजीच्या मोहातून मी माझी कविता वाचवली आहे "(पृ.१०मनोगत)ही हळव्या मनाची हिरवी किनार आपल्या शब्दांची धार आहे.हाच निर्धार घेऊन ही कविता आली आहे.या व्यवस्थेत वैधव्य,विधवा, परित्यक्ता यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन अत्यंत विकृत आहे.रोजच्या वर्तमानात जेंव्हा बातमी होऊन येते.अनैतिकतेचा कडेलोट होतो.म्हणून*'कुंकू नसलेलं कपाळ' ही बाईची सखेद वेदना, हळदी कुंकवाला मान नाही.टिकली हरवली की तिच्या मनाची अस्वस्थ अवस्था.सातबाऱ्यावर नावंच येऊ देऊ नका.हीखुसपट खपली,तिच्या कायम अपमानास्पद जखमा कायम दु:ख देणाऱ्या.हळदीकुंकू,आई होऊन पुढं चाल,'माझी माय' वैधव्य साजरं करू नकोस,शहरातील विधवा बाई,आरसा, मर्द आणि बाई,विळा, सुरक्षितता, विश्वास,माझी कविता,तिचा अनुत्तीर्ण प्रश्न, कुंकवानं भरलेलं कपाळ,कुंकवाआड, उद्याच्या बाईसाठी, व्यवस्था,विळा घट्ट धरून भाकर या कवितेमधून कवीने इतकी चिंतनाची डुब मांडली आहे की,बाई म्हणून आपल्या सृजनशील दृष्टीने ती किती महान आहे.केवळ बाईपणाच्या टिचल्या बांगड्या नाहीत,नुसतेच वैधव्य नाही कपाळ पुसून गोंदण ही खरडून काढलं आहे.इथं बाई पणाला एक दुखरी सल आहे ती उजागर करण्याचं शब्द निर्धार या कवितेतून व्यक्त होतो.कवी लिहितो. *जखमांना काडीने चिघळावं,तशा इथल्या परंपरा. मायला पुन्हा पुन्हा डिवचत राहिल्या. तिच्या अंतर्मनाला होणारे वार मला रोखता आले नाही म्हणून.. मी असाह्य होऊन ढसा ढसा रडलो. आणि माझ्या कवितेला, तिच्या शापित कोलाहलाच्या नोंदी सांगून गेली'*(पृ.८२) 'बाईचं उध्वस्त होते' या भागात शहरी निमशहरी बाईचं देहभान वासनेने निरखून पाहणे यात'खुर्चीवरची बाई बदलते फाईल तिचं आहे.बाईपणाला जप.कारण चारचौघात लेकराला छाती उघडी करून पाजते.तेव्हा तुझी नजर वाढीची होते.पण नाहीच ढळू देत डोईवरचा पदर,तुझा खरतर सोसिकपणाचा आदर्श आहे.या रात्रीच्या अंधारात नवरात्रीचा स्त्री शक्तीचा जागर म्हणजे तिच्या सूर्याची किरणं सार्वकालीक होतं आहे.म्हणून कृत्रिम गर्भधारणा हे विज्ञानाचं बाईपण तरी ही लुट थांबली पाहिजे.बाईची मर्जी.इथे कुत्रीच्या नजरेची चा◌ॅईस आहे.पदर छातीवर खाली आला म्हणून दगडं मारणारा दगडू.किंवा आज शहरातली (मा◌ॅडर्न)बाई गावं खेड्यातील मुलींना बावचळून टाकते आहे ब्युटीपालरच्या नावाखाली.गावनेच धसका घेतला.बाईचं माणसात येणं हेच खटकणारा खटका झाला आहे.म्हणून कवी म्हणतो.*पुरुषांनो,आभार माना विज्ञानाचे अजून मानवी अंतर्मनाचे सीसीटीव्ही फुटेज दिसत नाही टीव्हीच्या स्क्रीनवर*..(पृ.९९)या कवितेमधून बाईपणाच्या अवहेलनेचे सल 'मधूचंद्र, लिंगपिसाट, निर्भया,हे अनंत काळाचं काळकिभिन्न सत्य आहे.पण आईच्या नावाचा उध्दार करीत 'शिवी' आहे ज्या पवित्र योनीतून आपल्या साऱ्यांचा टाहो फुटला.त्यालाच शिवी देतं.हे परमेश्वरा तू कन्येला जन्मालाचं घालू नको.शेवट 'बाई भूई आणि कविता'हा भाग मन पिळवटून टाकतो.आईने ओवी म्हणून तुला अंगाई गायली.लेकीला परक्या घरी देणार अस्वस्थ शेतकरी बाप,माझी कविता आई होऊ पाहते.माहेरची माती,बाप आणि चिमण्या,माय राबते रानात,कुणब्याची पोर,शेतीमातीचा संसार,मातृभाव या कवितेचा आत्मा हा अतिशय मौलिक चिंतन आशय संपन्न सृजनशीलता देवून जाते.'खरं म्हणजे,बाई भूई अन् कवितेच्या मातृत्वाचा,तो उत्सव आहे.ही कविता बाईचा बे चा पाढा सांगते.बाई,आई,भूई,अंगाई,दवाई,पणती ,आरती,सवाई, विश्वाई,बाई दाहे ईश्वरी.या शापित बाईपणाच्या भरल्या कोलाहलत'चौकटीतल्या जगण्याला सुरुंग लावणारी कविता' कवयित्री योगिनी राऊळ यांनी अतिशय चिंतन आशय संपन्न सृजन समर्पक विवेचक प्रस्तावना लिहिली आहे"अशा काळात किन्नर, विधवा,वेश्या,अशा सतत हेटाळणीचा विषय ठरलेल्या स्त्रियांची कविता अरंविदा भामरे आपल्या समोर ठेवतात, हे कौतुकास्पद आहे.बाई म्हटलं की,अंगभर पदर, सालंकृत दागिने, जमिनीकडे नजर, कडेवर लेकरू इतकंच नसतं,तर त्याही पलिकडे बाईची रुपं आहेत.असं धिटाईने सांगणारी ही कविता'(प्रस्तावना पृ.९)हाअतिशय मर्मग्राही आस्वाद आहे.गंगा -भागीरथी म्हणून त्या विधवेचीअवहेलना.बालपण बाप,तरुणपण नवरा व म्हातारपण मुलगा.मुलांने बाईचं संगोपन करायचं ही कविता संयत मनोभूमिकेतून अस्सल बाईचा संचित जीवनानुबंध मांडते.श्रध्देय थोर समीक्षक डॉ फुला बागुल सरांचे ब्लर्ब"कवी अरंविदा भामरे यांनी यासाठी पुरेसे वाचन चिंतन केल्याचे जानवत राहते.वेगळ्या कवितेसाठी कवीने घ्यावयाचे श्रम घेतले आहेत.बोजडता, क्लिष्टता, दुर्बोधता या घटनांपासून ही कविता अलिप्त आहे.नारीच्या विविध जीवनस्वरूपाची आकलने मांडणाऱ्या काव्यप्रवाहात हा संग्रह नांदू शकेल एवढे बळ या संग्रहातील आशयात नक्कीचं आहे."(पाठराखण) ख्यातनाम चित्रकार सरदार जाधव यांचे मुखपृष्ठ आशय संपन्न आहे.कवी अरंविदा भामरे जी मनःपूर्वक अभिनंदन व शुभेच्छा.

**कवितासंग्रह:-शापित कोलाहलाच्या नोंदी**
**कवी लेखक:-अरंविंदा राजधर भामरे**
**प्रकाशक:-सौ.सोनाली गजानन शिंदे, सृजनसंवाद.ठाणे**
**संपादक:-गीतेश गजानन शिंदे**
**प्रथमवृती:-१मार्च २०२५**
**मुखपृष्ठ:-सरदार जाधव**
**किंमत:-२५०/रूपये**
**परिचय:- डॉ प्रभाकर शेळके, जालना**

## फोटोग्राफर माकड

एकदा एका जंगलात
माकडाने आणला कॅमेरा
जंगली मित्रांचे फोटो
काढू लागला भराभरा

सूट बूट घालून कोल्ह्याने
केली हिरो सारखी स्टाईल
फोटो काढतांना माकड म्हणे
कोल्होबा थोडं स्माईल

मोर लांडोर हिरवळीवर
करू लागले डान्स
त्यांचा फोटो काढण्याचा
माकडाला मिळाला चान्स

माझा फोटो काढा
गाढवाने हट्ट धरला
त्याच्या समाधानासाठी
केवळ फ्लॅश मारला

गुहेतून सिंहमहाराज
आले धावत धावत
आधी माझा फोटो काढा
म्हणाले रागावत

माकडाला पडला प्रश्न
कारण संपली होती मेमरी
कॅमेरा तिथेच ठेऊन
माकड पळाला घरी



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १५ मे २०२६

# कुटुंब : समाजजीवनाचा सशक्त आधार

मानव हा मूलतः सामाजिक प्राणी आहे. समाजात राहून, परस्परांशी संवाद साधून आणि नातेसंबंध जपत तो आपले जीवन समृद्ध करतो. या सामाजिक जीवनाचा पाया म्हणजे कुटुंब. व्यक्तीच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत तिच्या जीवनाला आकार देणारी, संस्कारांची शिदोरी देणारी आणि संकटसमयी आधार देणारी सर्वात महत्त्वाची संस्था म्हणजे कुटुंब होय. जगभरात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि तांत्रिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल होत असताना कुटुंब संस्थेचे महत्त्व अधिक अधोरेखित होत आहे. या पार्श्वभूमीवर दरवर्षी १५ मे हा दिवस 'आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन' म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्र संघाने १९९३ मध्ये हा दिवस घोषित केला आणि १९९४ पासून जगभरात त्याचे औपचारिक आयोजन सुरू झाले. या दिवसामागील मुख्य उद्दिष्ट म्हणजे कुटुंब संस्थेचे समाजातील महत्त्व अधोरेखित करणे, कुटुंबांसमोरील समस्या समजून घेणे आणि कुटुंबव्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी समाज व शासन यांना जागृत करणे होय.भारतीय संस्कृतीत कुटुंबाला अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचे स्थान दिले गेले आहे. 'वसुधैव कुटुंबकम्' ही संकल्पना भारतीय परंपरेतूनच जगाला मिळाली आहे. संपूर्ण विश्व हे एक कुटुंब आहे, अशी व्यापक भावना भारतीय संस्कृती जोपासते. त्यामुळेच भारतीय समाजात कुटुंब ही केवळ राहण्याची व्यवस्था नसून ती भावनिक, नैतिक, सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांची जपणूक करणारी जीवनपद्धती मानली जाते. आई-वडील, आजी-आजोबा, भाऊ-बहिण, नातेवाईक आणि इतर सदस्य यांच्यातील प्रेम, जिव्हाळा, सहकार्य आणि त्याग या मूल्यांमुळे कुटुंब अधिक दृढ बनते. कुटुंब ही व्यक्तीच्या भावविश्वाची पहिली शाळा असते. बालकाच्या व्यक्तिमत्त्व विकासाची सुरुवात कुटुंबातूनच होते. बोलणे, चालणे, वागणे, इतरांशी संबंध ठेवणे, संस्कार, नैतिकता, शिस्त, सहकार्य, आदर, कर्तव्यभावना आणि सामाजिक जबाबदारी यांचे प्राथमिक शिक्षण बालकाला कुटुंबातून मिळते.कुटुंब संस्थेचा इतिहास अत्यंत प्राचीन आहे. मानवाच्या आदिम जीवनात संरक्षण, अन्न, सुरक्षितता आणि प्रजनन या गरजांमधून कुटुंबव्यवस्थेची निर्मिती झाली. कालांतराने समाजरचना बदलत गेली आणि कुटुंबसंस्थाही विकसित होत गेली. प्राचीन काळात संयुक्त कुटुंब पद्धतीला विशेष महत्त्व होते. एकाच घरात अनेक पिढ्या एकत्र राहून परस्पर सहकार्याने जीवन जगत असत. या पद्धतीत आर्थिक सुरक्षितता, मुलांचे संगोपन, वृद्धांची काळजी आणि सांस्कृतिक परंपरांचे जतन सहज शक्य होत असे. आधुनिक काळात शहरीकरण, औद्योगिकीकरण, स्थलांतर, शिक्षणाचा प्रसार आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या संकल्पनांमुळे विभक्त कुटुंब पद्धती वाढू लागली. आज बहुसंख्य कुटुंबे आई-वडील आणि मुलांपुरती मर्यादित झालेली दिसतात. तथापि, कुटुंबाचे स्वरूप बदलले असले तरी त्याचे महत्त्व अजिबात कमी झालेले नाही.आजच्या धकाधकीच्या जीवनात कुटुंब ही व्यक्तीसाठी मानसिक शांतता आणि भावनिक आधार देणारी सर्वात मोठी शक्ती आहे. जीवनातील संघर्ष, स्पर्धा, ताणतणाव आणि असुरक्षितता यांमुळे अनेक व्यक्ती मानसिकदृष्ट्या अस्थिर होत आहेत. अशा परिस्थितीत प्रेमळ कुटुंब व्यक्तीला धीर, आत्मविश्वास आणि मानसिक आधार देते. कुटुंबातील सदस्यांमधील संवाद, सहानुभूती आणि परस्पर विश्वास यांमुळे व्यक्तीला सुरक्षिततेची भावना मिळते. विशेषतः बालक, महिला आणि वृद्ध यांच्यासाठी कुटुंबाचे महत्त्व अधिक असते. बालकाच्या मानसिक, बौद्धिक आणि भावनिक विकासासाठी कुटुंबातील वातावरण अत्यंत महत्त्वाचे असते. ज्या कुटुंबात प्रेम, शिस्त, समता आणि संवाद असतो, त्या कुटुंबातील मुले आत्मविश्वासपूर्ण आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम बनतात.महिलांच्या जीवनातही कुटुंबाचे विशेष स्थान आहे. भारतीय समाजात महिलेला कुटुंबाचा केंद्रबिंदू मानले जाते. आई म्हणून ती मुलांवर संस्कार करते, पत्नी म्हणून सहजीवनाला बळ देते आणि मुलगी म्हणून कुटुंबातील नात्यांना जिव्हाळा देते. तथापि, अनेक वेळा महिलांवर घरगुती जबाबदाऱ्यांचे ओझे अधिक पडते. आधुनिक काळात महिलांनी शिक्षण, रोजगार, उद्योग, राजकारण, विज्ञान आणि प्रशासन अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती केली आहे. त्यामुळे कुटुंबातील भूमिका आणि जबाबदाऱ्या यामध्येही बदल होत आहेत. स्त्री-पुरुष समानतेची भावना, परस्पर सन्मान आणि सहकार्य यांवर आधारित कुटुंबव्यवस्था आजच्या काळाची गरज बनली आहे. महिलांच्या सक्षमीकरणाशिवाय कुटुंबाचे सुदृढीकरण शक्य नाही.वृद्धांच्या दृष्टीने कुटुंब हा जीवनाचा आधारस्तंभ असतो. वाढत्या वयामुळे निर्माण होणाऱ्या शारीरिक आणि मानसिक समस्यांमध्ये कुटुंबीयांचे सहकार्य अत्यंत आवश्यक असते. परंतु आधुनिक जीवनशैली, स्थलांतर आणि विभक्त कुटुंब पद्धतीमुळे अनेक वृद्ध एकाकीपणाला सामोरे जात आहेत. वृद्धाश्रमांची वाढती संख्या ही सामाजिक चिंतेची बाब आहे. ज्येष्ठ नागरिकांकडे अनुभवाचा मोठा खजिना असतो. त्यांच्या मार्गदर्शनामुळे कुटुंबातील तरुण पिढीला जीवनमूल्ये समजतात. त्यामुळे वृद्धांचा सन्मान, त्यांची काळजी आणि त्यांच्याशी संवाद राखणे हे प्रत्येक कुटुंबाचे नैतिक कर्तव्य आहे.कुटुंब ही केवळ भावनिक संस्था नसून आर्थिकदृष्ट्याही महत्त्वाची संस्था आहे. कुटुंबातील सदस्य परस्पर सहकार्याने आर्थिक गरजा पूर्ण करतात. उत्पन्न, खर्च, बचत आणि नियोजन या गोष्टींचे व्यवस्थापन कुटुंबातूनच शिकले जाते. गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांमध्ये परस्पर सहकार्यामुळे अनेक संकटांना सामोरे जाणे शक्य होते. बेरोजगारी, आजारपण, अपघात किंवा आर्थिक अडचणीच्या काळात कुटुंब हे व्यक्तीचे सर्वात मोठे संरक्षण असते. ग्रामीण भागात शेती, पशुपालन आणि घरगुती उद्योग यामध्ये कुटुंबातील सर्व सदस्य सहभागी होत असल्यामुळे आर्थिक स्थैर्य निर्माण होते.कुटुंब हे संस्कृती आणि परंपरांचे जतन करणारे महत्त्वाचे माध्यम आहे. भाषा, धर्म, सण-उत्सव, चालीरीती, लोकपरंपरा आणि सामाजिक मूल्ये यांचा वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे कुटुंबातूनच पोहोचतो. दिवाळी, दसरा, ईद, ख्रिसमस, बुद्ध पौर्णिमा, गणेशोत्सव किंवा इतर सण एकत्र साजरे केल्यामुळे नात्यांमध्ये आपुलकी वाढते. भारतीय संस्कृतीतील 'एकत्र कुटुंब' ही संकल्पना सामूहिक जीवन, सहजीवन आणि सामाजिक एकात्मतेचे प्रतीक आहे. कुटुंबातील सण-समारंभ, विवाह, धार्मिक विधी आणि सामाजिक कार्यक्रम हे व्यक्तींना एकमेकांशी जोडून ठेवतात.आजच्या डिजिटल युगात कुटुंबसंस्थेसमोर अनेक नवीन आव्हाने उभी राहिली आहेत. मोबाईल, इंटरनेट आणि सामाजिक माध्यमांचा अतिरेकी वापर यामुळे कुटुंबातील प्रत्यक्ष संवाद कमी होत आहे. एकाच घरात राहूनही सदस्य एकमेकांपासून मानसिकदृष्ट्या दूर जात असल्याचे चित्र दिसते. कामाचा वाढता ताण, व्यस्त जीवनशैली आणि स्पर्धात्मक वातावरण यांमुळे कुटुंबासाठी वेळ देणे कमी झाले आहे. अनेकदा संवादाचा अभाव, गैरसमज, अपेक्षाभंग आणि आर्थिक ताण यांमुळे कौटुंबिक कलह निर्माण होतात. घटस्फोटांचे वाढते प्रमाण, कौटुंबिक हिंसा, व्यसनाधीनता आणि मानसिक आरोग्याच्या समस्या यांमुळे कुटुंबव्यवस्था अस्थिर होत असल्याची चिंता व्यक्त केली जाते.बालकांवरील वाढते मानसिक दडपण हीदेखील गंभीर समस्या आहे. शैक्षणिक स्पर्धा, करिअरची चिंता आणि पालकांच्या अपेक्षा यांमुळे अनेक मुले तणावग्रस्त होत आहेत. अशा वेळी मुलांशी मैत्रीपूर्ण संवाद साधणे, त्यांच्या भावना समजून घेणे आणि त्यांना प्रेमळ वातावरण देणे अत्यंत आवश्यक आहे. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ भौतिक सुविधा पुरेशा नसतात; त्यांना भावनिक सुरक्षितता आणि आत्मीयतेची गरज असते. कुटुंबातील सकारात्मक वातावरणामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि सामाजिक संवेदनशीलता विकसित होते.कौटुंबिक हिंसा ही कुटुंबसंस्थेसमोरील आणखी एक गंभीर समस्या आहे. महिलांवर होणारा शारीरिक, मानसिक आणि आर्थिक अत्याचार, मुलांवरील हिंसा आणि वृद्धांचा छळ या समस्या अनेक कुटुंबांमध्ये दिसून येतात. अशा प्रकारच्या हिंसेमुळे कुटुंबातील विश्वास आणि प्रेम नष्ट होते. त्यामुळे समाजात असुरक्षितता आणि मानसिक अस्थिरता वाढते. कुटुंबातील प्रत्येक सदस्याचा सन्मान, समानता आणि स्वातंत्र्य यांचे रक्षण करणे आवश्यक आहे. कायद्याबरोबरच सामाजिक जागृती आणि संवेदनशीलता यांद्वारेच या समस्यांवर प्रभावी उपाय करता येतील.कोविड-19 महामारीच्या काळात कुटुंबसंस्थेचे महत्त्व जगाने नव्याने अनुभवले. लॉकडाऊन, आर्थिक संकट आणि आरोग्यविषयक भीती यांच्या काळात कुटुंबीयांनी एकमेकांना मानसिक आणि भावनिक आधार दिला. अनेकांनी आपल्या कुटुंबासोबत अधिक वेळ घालवला आणि नातेसंबंधांचे महत्त्व पुन्हा जाणले. या काळात आरोग्य, सुरक्षितता आणि परस्पर सहकार्य यांचे महत्त्व अधिक स्पष्ट झाले. त्याचबरोबर घरगुती हिंसा, बेरोजगारी आणि मानसिक तणाव यांसारख्या समस्याही समोर आल्या. त्यामुळे कुटुंबव्यवस्था अधिक संवेदनशील आणि समतोल बनविण्याची गरज अधोरेखित झाली.आंतरराष्ट्रीय कुटुंब दिनाच्या निमित्ताने विविध देशांमध्ये जनजागृती कार्यक्रम, परिसंवाद, कार्यशाळा आणि सांस्कृतिक उपक्रम आयोजित केले जातात. कुटुंब कल्याण, महिलांचे सक्षमीकरण, बालहक्क, वृद्धांची सुरक्षा आणि मानसिक आरोग्य यांसारख्या विषयांवर चर्चा केली जाते. संयुक्त राष्ट्र संघ दरवर्षी या दिनासाठी विशिष्ट संकल्पना जाहीर करतो. या संकल्पनांमधून कुटुंबसंस्थेच्या विविध पैलूंवर जागतिक स्तरावर लक्ष केंद्रित केले जाते. शाश्वत विकास, लिंग समानता, आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक समावेशकता यांसारख्या उद्दिष्टांच्या पूर्ततेत कुटुंबाची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते.भारतातील कुटुंबव्यवस्थेची काही वैशिष्ट्ये विशेष उल्लेखनीय आहेत. भारतीय कुटुंबांमध्ये नातेसंबंधांना मोठे महत्त्व दिले जाते. परस्पर आदर, मोठ्यांचा सन्मान, लहानांवर प्रेम आणि सामूहिक निर्णय प्रक्रिया या मूल्यांमुळे भारतीय कुटुंबव्यवस्था मजबूत राहिली आहे. ग्रामीण भागात अजूनही संयुक्त कुटुंब पद्धतीचे अस्तित्व काही प्रमाणात दिसून येते. तथापि, बदलत्या सामाजिक परिस्थितीत कुटुंबव्यवस्थेतही परिवर्तन होत आहे. महिलांचे शिक्षण, रोजगार, स्थलांतर आणि शहरीकरण यांमुळे पारंपरिक भूमिकांमध्ये बदल होत आहेत. या बदलांना सकारात्मक दृष्टीने स्वीकारून समतोल आणि संवेदनशील कुटुंबव्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे.आजच्या काळात कुटुंबातील संवादाचे महत्त्व अधिक वाढले आहे. संवाद हा कोणत्याही नात्याचा आत्मा असतो. कुटुंबातील सदस्यांनी एकमेकांच्या भावना समजून घेतल्या पाहिजेत. मतभेद असले तरी परस्पर आदर आणि संयम राखणे गरजेचे आहे. अनेक समस्या संवादाच्या अभावामुळे निर्माण होतात. त्यामुळे दररोज काही वेळ एकत्र घालवणे, चर्चा करणे, जेवण एकत्र घेणे आणि कुटुंबीयांच्या सुख-दुःखात सहभागी होणे यामुळे नात्यांमध्ये दृढता येते.कुटुंबातील मुलांना नैतिक मूल्यांचे शिक्षण देणे ही काळाची गरज आहे. प्रामाणिकपणा, सहकार्य, पर्यावरण संरक्षण, सामाजिक जबाबदारी, ज्येष्ठांचा आदर आणि स्त्री-पुरुष समानता यांसारखी मूल्ये बालपणापासून रुजविणे आवश्यक आहे. आज माध्यमे आणि डिजिटल जगाचा मुलांवर मोठा प्रभाव पडत आहे. त्यामुळे पालकांनी मुलांच्या मानसिक आणि सामाजिक विकासाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. मुलांना केवळ शैक्षणिक यशासाठी प्रोत्साहित न करता त्यांना संवेदनशील आणि जबाबदार नागरिक बनविण्यावर भर दिला पाहिजे.आर्थिक बदलांचा कुटुंबसंस्थेवर मोठा परिणाम होत आहे. वाढती महागाई, बेरोजगारी, रोजगारातील अस्थिरता आणि स्थलांतर यांमुळे अनेक कुटुंबे तणावाखाली आहेत. कामाच्या निमित्ताने पालक घराबाहेर अधिक वेळ घालवत असल्यामुळे मुलांसोबतचा संवाद कमी होतो. दुसरीकडे, महिलाही रोजगार क्षेत्रात सक्रिय झाल्यामुळे घरातील जबाबदाऱ्यांचे पुनर्वाटप आवश्यक झाले आहे. घरकाम आणि मुलांचे संगोपन ही केवळ महिलांची जबाबदारी नसून ती सर्व सदस्यांची सामूहिक जबाबदारी आहे, ही भावना समाजात दृढ होणे आवश्यक आहे.मानसिक आरोग्य आणि कुटुंब यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. ज्या व्यक्तीला कुटुंबाचा आधार मिळतो, ती व्यक्ती मानसिकदृष्ट्या अधिक सक्षम राहते. प्रेम, विश्वास आणि सहकार्य यांमुळे व्यक्तीच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण होते. उलटपक्षी, कौटुंबिक तणाव, हिंसा किंवा दुर्लक्ष यांमुळे नैराश्य, चिंता आणि मानसिक विकार निर्माण होऊ शकतात. त्यामुळे कुटुंबातील प्रत्येक सदस्याच्या भावनांचा आदर करणे आणि मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढविणे आवश्यक आहे.आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन हा केवळ एक औपचारिक उत्सव नसून समाजाला आत्मपरीक्षण करण्याची संधी आहे. आपण आपल्या कुटुंबासाठी किती वेळ देतो? कुटुंबातील सदस्यांच्या भावना कितपत समजून घेतो? वृद्ध, महिला आणि मुलांच्या गरजांकडे किती संवेदनशीलतेने पाहतो? या प्रश्नांचा विचार या निमित्ताने होणे आवश्यक आहे. आधुनिक जीवनशैलीत भौतिक सुखसोयी वाढल्या असल्या तरी नातेसंबंधांमध्ये दुरावा निर्माण होत असल्याचे दिसते. त्यामुळे कुटुंबातील प्रेम, संवाद आणि सहजीवन यांना नव्याने बळ देणे ही काळाची गरज आहे.शिक्षण संस्थांनीदेखील कुटुंबमूल्यांच्या जपणुकीत महत्त्वाची भूमिका बजावली पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक संवेदनशीलता, सहकार्य आणि कुटुंबाविषयी आदर निर्माण करणारे उपक्रम राबविणे आवश्यक आहे. समाजमाध्यमे, चित्रपट आणि प्रसारमाध्यमे यांनीही सकारात्मक कुटुंबमूल्यांचा प्रसार करणे गरजेचे आहे. केवळ मनोरंजनासाठी हिंसा, तणाव किंवा नकारात्मक नातेसंबंध दाखविण्याऐवजी प्रेम, समता आणि सहजीवन यांचे महत्त्व अधोरेखित केले पाहिजे.शासन स्तरावरही कुटुंबसंस्थेला बळकटी देण्यासाठी विविध योजना आणि धोरणांची आवश्यकता आहे. महिलांचे संरक्षण, बालहक्क, वृद्धकल्याण, आरोग्य सुविधा, शिक्षण आणि रोजगार निर्मिती या माध्यमातून कुटुंबांचे जीवनमान सुधारता येऊ शकते. कौटुंबिक समुपदेशन केंद्रे, महिला सहाय्यता केंद्रे आणि मानसिक आरोग्य सेवा यांचा विस्तार करणे आवश्यक आहे. विशेषतः ग्रामीण आणि आदिवासी भागांमध्ये सामाजिक सुरक्षा आणि आरोग्य सुविधांची उपलब्धता वाढविणे गरजेचे आहे.ग्रामीण समाजात कुटुंबव्यवस्था अजूनही सामाजिक ऐक्य टिकवून ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. शेती, सण-उत्सव, सामाजिक कार्यक्रम आणि परंपरा यांमुळे कुटुंबातील सदस्य एकत्र राहतात. परंतु ग्रामीण भागातही स्थलांतर, बेरोजगारी आणि आर्थिक संकट यांमुळे कुटुंबसंस्थेवर परिणाम होत आहे. त्यामुळे ग्रामीण विकास, रोजगारनिर्मिती आणि शिक्षणाच्या संधी वाढविणे आवश्यक आहे.आदिवासी समाजातील कुटुंबव्यवस्था देखील अनेक बाबतीत वैशिष्ट्यपूर्ण आहे. सामूहिकता, निसर्गाशी जवळीक आणि परस्पर सहकार्य ही त्यांची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. तथापि, आधुनिकतेच्या प्रभावामुळे आणि आर्थिक बदलांमुळे त्यांच्या पारंपरिक जीवनपद्धतीत बदल होत आहेत. आदिवासी कुटुंबांचे सामाजिक आणि सांस्कृतिक संरक्षण करणे हे देखील समाजाचे कर्तव्य आहे.कुटुंबातील महिलांचा सन्मान आणि निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढविणे ही सुदृढ समाजनिर्मितीची पूर्वअट आहे. स्त्री-पुरुष समानता ही केवळ कायद्याची बाब नसून ती सामाजिक मानसिकतेचा भाग बनली पाहिजे. मुलगा आणि मुलगी यांच्यातील भेदभाव नष्ट करून समान संधी देणे आवश्यक आहे. मुलींना शिक्षण, आरोग्य आणि स्वावलंबनाच्या संधी मिळाल्यास संपूर्ण कुटुंब आणि समाजाचा विकास अधिक वेगाने होतो.तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास कुटुंबसंस्था अधिक मजबूत होऊ शकते. दूर राहणारे कुटुंबीय व्हिडिओ कॉल, संदेश आणि सामाजिक माध्यमांद्वारे संपर्कात राहू शकतात. परंतु तंत्रज्ञानाचा अतिरेकी वापर नात्यांमध्ये दुरावा निर्माण करू शकतो. त्यामुळे डिजिटल साधनांचा समतोल आणि जबाबदारीने वापर करणे आवश्यक आहे.आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन आपल्याला हे स्मरण करून देतो की समाजाच्या प्रगतीचा पाया सुदृढ कुटुंबव्यवस्थेत आहे. व्यक्ती घडली तर कुटुंब घडते आणि कुटुंब घडले तर समाज व राष्ट्र मजबूत होते. प्रेम, संवाद, परस्पर आदर, समानता आणि सहकार्य या मूल्यांवर आधारित कुटुंबव्यवस्था निर्माण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. आधुनिकतेच्या प्रवाहात पारंपरिक मूल्यांचे जतन करताना नव्या विचारांना स्वीकारणे आवश्यक आहे. बदलत्या काळानुसार कुटुंबाचे स्वरूप बदलत असले तरी त्याची गरज आणि महत्त्व कायम राहणार आहे.आजच्या वेगवान आणि स्पर्धात्मक युगात प्रत्येक व्यक्तीला भावनिक आधाराची गरज आहे. हा आधार कुटुंबच देऊ शकते. पैसा, पद आणि प्रतिष्ठा यापेक्षा प्रेमळ नातेसंबंध अधिक मौल्यवान असतात. त्यामुळे आपल्या कुटुंबासाठी वेळ देणे, एकमेकांना समजून घेणे आणि संकटसमयी साथ देणे ही खरी जीवनसमृद्धी आहे. कुटुंबातील आनंद, समाधान आणि एकोपाच समाजाच्या स्थैर्याचे आणि राष्ट्राच्या प्रगतीचे खरे मापदंड आहेत.१५ मे रोजी साजरा होणारा आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन आपल्याला कुटुंबाच्या या अनमोल मूल्यांची आठवण करून देतो. या निमित्ताने प्रत्येकाने आपल्या कुटुंबातील नात्यांना अधिक दृढ करण्याचा संकल्प केला पाहिजे. प्रेम, विश्वास, समता आणि सहकार्य यांच्या आधारावर उभे राहिलेले कुटुंबच सुदृढ समाज आणि समृद्ध राष्ट्र निर्माण करू शकते. म्हणूनच कुटुंब ही केवळ सामाजिक संस्था नसून मानवी जीवनाचा आत्मा आहे, असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
ईमेल – bagate.rajendra5@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १५ मे २०२६